**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**
Online ISSN 2278-8808, SJIF 2024 = 8.153
https://www.srjis.com/issues_data/234
Peer Reviewed & Refereed Journal, MAY-JUNE 2024, Vol- 13/83

# महात्मा ज्योतिबा फुले यांचे समाज सुधारणेचे कार्य

**प्रा. डॉ. दिलीप काशिनाथ काठोडे**

*सहाय्यक प्राध्यापक, जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, सिडको, नांदेड.*

**Paper Received On**: 20 May 2024
**Peer Reviewed On**: 24 June 2024
**Published On:** 01 July 2024

## प्रस्तावना

भारतीय सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा ज्योतिबा फुले एक महान समाज सुधारक होते. त्यांनी समाजात असलेली विषमता दूर करण्याचे कार्य आपल्या आयुष्यभर केले. प्रस्थापित समाजाचा विरोध पत्करून सामाजिक न्याय देण्याचे, समाजात समता आणण्याचे कार्य केले. समाजात असलेली अस्पृश्यता विधवा, पुनर्विवाह, स्त्री शिक्षण, शेतकऱ्यांच्या समस्या, धार्मिक सुधारणा, सत्यशोधक समाजाची स्थापना करून सामाजिक विकास कार्याची चळवळ त्यांनी तळागळाच्या समाजापर्यंत पोहोचले आणि सामाजिक सुधारणा त्याकाळी घडविली. त्या काळात भारतीय समाज वर्णव्यवस्थेवर आधारित आपले जीवन जगत होता. चतुरवर्णी व्यवस्थेत समाजातील प्रतिष्ठा जातीवर आधारलेली होती. जाती संस्था मजबूत होत्या. उच्च जाती- कनिष्ठजाती अशी समाजात उतरंड अस्तित्वात होती. त्यामुळे भारतीय समाजाचे विविध जाती मध्ये विभाजन झाले होते. रोटी बंदी, बेटी बंदी, विद्या बंदी, तत्कालीन समाजात अस्तित्वात होती हे महात्मा ज्योतिबा फुलेंच्या लक्षात आले ते 1848 मध्ये त्यांच्या उच्च वर्णी मित्राच्या लग्नाच्या वरातीत त्यांचा घोर अपमान झाला. उच्च व कनिष्ठ वर आधारलेला समाज बदलला पाहिजे. समाजात समता आली पाहिजे व सर्वजण पुन्हा गुण्यागोविंदाने जगले पाहिजे यासाठी त्यांनी समाज सुधारण्याचे कार्य हाती घेतले.

## संशोधनाचा उद्देश

1) महात्मा फुले यांचे समाज सुधारण्याचे कार्य अभ्यासणे.

2) महात्मा फुले यांच्या कार्यातून समाजात झालेला बदल अभ्यासणे.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधन पद्धती**

सदरील शोधनिबंध लिहीत असताना दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला असून त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट इत्यादीचा आधार घेऊन विशिष्ट उद्देश डोळ्यासमोर ठेवून साहित्य सामग्री संकलन करण्यात आले.

**अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य**

अस्पृश्यता ही भारतीय समाजातील लाजिरवाणी गोष्ट होती. समाजातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या विहिरीचे पाणी अस्पृश्यतांना वाटले प्रस्थापितांचा विरोध पत्करला आणि भारतीय सामाजिक सुधारणेला सुरुवात केली. अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला आणि अति शूद्र यांच्या शिक्षणाकडे त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले. इ.स.1852 मध्ये त्यांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केली. अस्पृश्य समाजात जनजागृती घडून यावी म्हणून त्यांनी सांगितले की, विद्यासंपन्न करावी कारण " विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नितीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्तविना शूद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले. असा संदेश त्यांनी बहुजन समाजाला देऊन अस्पृश्यता निवारण्याचे कार्य केले.

**स्त्री शिक्षणाचे कार्य**

महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्री दास्यातून मुक्तता करण्यासाठी स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेतले. पारंपारिक समाज व्यवस्थेने स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवले होते. शिक्षण हे व्यक्ती विकासाचे मुख्य साधन आहे असे महात्मा फुलेंना वाटत होते. प्रस्थापितांना प्रतिउत्तर देण्यासाठी त्यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतले एका स्त्रीला शिक्षण दिले तर संपूर्ण कुटुंब सुधारते हे ओळखून त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत पुण्यामध्ये 1848 ला मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरू केली. मुलींना शिकविण्यासाठी शिक्षिका मिळत नव्हती म्हणून त्यांनी सावित्रीबाईंना शिक्षिका बनवले. प्रस्थापितांनी या गोष्टीला विरोध केला. हा विरोध पत्करून त्यांनी आपले शैक्षणिक कार्य सुरू ठेवले. तसेच बालहत्या प्रतिबंध ग्रहाची निर्मिती केली. विधवा पुनर्विवाह घडवून आणला.

**सत्यशोधक समाजाची स्थापना**

भारतीय समाजात सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांनी 1873 ला सत्यशोधक समाजाची स्थापना केली जनसामान्यापर्यंत या चळवळीच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट प्रथा दूर करण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांच्या मते सर्व माणसे एका निर्मिकाची लेकरे आहेत व देवाची प्रार्थना करण्यासाठी पुरोहित ब्राह्मणांची आवश्यकता नाही असे सांगितले. तसेच त्यांनी समाजातील कनिष्ठ वर्गाला मानसिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी कार्य केले. सत्यशोधक चळवळीद्वारे

Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

उभारण्यात आलेल्या लढा हा सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक गुलामगिरीतून समाजाला बाहेर काढण्यासाठी होता.

**शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य**

भारत देशा कृषी प्रधान देश आहे तरी देखील येथील शेतकरी सुखी समाधानी नव्हता. शेतकऱ्यांच्या समस्यांची सूक्ष्म अध्ययन महात्मा ज्योतिबा फुले यांनी करून शेतकऱ्यांचा आसूड हा ग्रंथ लिहिला त्यात त्यांनी शेतकऱ्यांची व्यथा मांडली. शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी ब्रिटिश सरकारला सूचना दिल्या. शेतकऱ्यांची नैसर्गिक आपत्ती यावेळी सर्वतोपरी मदत करण्याचा प्रयत्न केला. तसेच महात्मा ज्योतिबा फुले यांनी सार्वजनिक सत्य धर्म, गुलामगिरी या ग्रंथातून आपले विचार मांडले. हंटर आयोगाला प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत दिली पाहिजे यासाठी निवेदन दिले. भारतीय समाजाला एकसंघ बांधण्याचे कार्य त्यांनी केले. समाजातील अनिष्ट प्रथा परंपरा दूर करण्याचे कार्य त्यांनी केले. एका आदर्श समाजाची निर्मिती सत्यशोधक चळवळी द्वारे केली.

**निष्कर्ष**

महात्मा ज्योतिबा फुले यांनी त्याकाळी केलेली समाज सुधारणा आजही भारतीय समाजाला मार्गदर्शक ठरत आहे. त्यांनी केलेल्या कार्यामुळे आज भारतीय स्त्रिया शिक्षण घेत आहेत. शासन शेतकऱ्यांकडे लक्ष देत आहेत. समाजातील अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात दूर झालेल्या आपणास पाहावयास मिळतात. शिक्षण न घेतल्यामुळे अधोगती होते त्यांनी सांगितल्यामुळे, प्रत्येक जण आज शिक्षण घेण्याचा प्रयत्न करीत आहे. सर्व जाती-धर्माचे लोक आज गुण्यागोविंदाने राहताना दिसून येतात. भारत देश हा विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे ते त्या काळी केलेल्या महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संघर्ष मुळे, आज बहुजन समाज विकसित होताना दिसत आहे.

**संदर्भ ग्रंथ**

*य दि फडके, महात्मा फुले समग्र वाड्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई.*
*नागनाथ कोत्तापल्ले, ज्योतीपर्व, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.*
*भारत पाटणकर, महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष, लोक वाड्मय प्रकाशन, मुंबई.*
*लीला घोडके, महात्मा फुलेंची जीवन क्रांती, जिजाई प्रकाशन, पुणे.*
*तानाजी ठोंबरे, महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य, लोक वाङ्मय प्रकाशन, मुंबई.*
*व्ही एन स्वामी, महाराष्ट्रातील समाज सुधारक, विद्याभारती प्रकाशन, लातूर.*

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*